क्र.२/नमवि/प्रशासक/ ०७/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २० नोव्हेंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०७/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या बेडग रोड येथील कचरा डेपो मध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाची स्थळ पहाणी करणे व पुढील कामकाजाचे नियोजन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेकरिता **मंगळवार दि.२१/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०७/११/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. मिरज येथील स.नं.४९/३/१/१ जुना स.नं.१६/३/१/१ या महानगरपालिकेच्या खुल्या जागेमध्ये नविन ट्रान्सफॉर्मर बसवून मिळणेकामी नाहरकत मिळणेबाबत धोरणात्मक निर्णयास्तव **उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्र.**

३. महानगरपालिकेकडील कार्यरत वैद्यकीय अधिकारी डॉ.छाया हंकारे यांचे मागणी अर्जानुसार पुणे महानगरपालिका येथे एकतर्फी बदली करणेस मा.शासन स्तरावर निर्णयास्तव प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१६/११/२०२३ चे विषयपत्र.**

४. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, सन २०२३-२४ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील ०३ कामे र.रु.३,२३,९५,४७९/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरी साठी पाठविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२०/११/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २४ **दिनांक :- २१/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०७/११/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२० ते ठराव क्र.२३ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २५ **दिनांक :- २१/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मिरज येथील स.नं.४९/३/१/१ जुना स.नं.१६/३/१/१ या महानगरपालिकेच्या खुल्या जागेमध्ये नविन ट्रान्सफॉर्मर बसविणेकामी त्या भागातील नागरिकांची मागणी असलेमुळे सदर ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविणेसाठी ५मी.X५मी. अशी २५ स्क्वे.मीटरची जागा सन २०२३-२४ सालाची चालू दर शिघ्रसिद्धगणकानुसार होणारे वार्षिक भाडे प्रतिवर्षी र.रु.५७४५/- प्रमाणे भाडेने महावितरण कंपनीस देणेस व सदरचे दरवर्षी प्रमाणे होणारे भाडे पोल शिफ्टींग कामामध्ये समायोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स.म.न.र.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २६ **दिनांक :- २१/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१६/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिकेकडील कार्यरत वैद्यकीय अधिकारी डॉ.छाया हंकारे या महापालिकेमध्ये माहे मार्च २००७ पासून कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत होत्या. त्यांना शासनाच्या दि.०१/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार महापालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी वर्ग २ या पदावर कायमपणे सामावून घेणेत आले आहे. डॉ.छाया हंकारे यांचे पती डॉ.रामचंद्र हंकारे हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागकडे उपसंचालक आरोग्य सेवा तथा सहायक संचालक आरोग्य सेवा या पदावर राज्य कुटूंब कल्याण कार्यालय,पुणे येथे कार्यरत असून, त्यांची दोन्ही मुले पुणे येथे वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. डॉ.छाया हंकारे या सांगली येथे वास्तव्यास असून, त्यांचे संपूर्ण कुटूंब पुणे येथे वास्तव्यास असल्याने डॉ.छाया हंकारे यांनी मा.अप्पर मुख्य सचिव नगरविकास विभाग,मुंबई यांचेकडे पुणे किंबा पिंपरी चिंचवड महापालिका येथे वैद्यकीय अधिकारी या पदावर पती-पत्नी एकत्रिकरणांतंर्गत बदली करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच, डॉ.छाया हंकारे यांच्या एकतर्फी बदलीस मा.नाम.डॉ.सुरेशभाऊ खाडे कामगार मंत्री तसेच, मा.नाम.रावसाहेब पाटील-दानवे राज्यमंत्री भारत सरकार यांनीही शिफारस केलेली आहे.

डॉ.छाया हंकारे यांची मार्च २००७ ते आक्टोंबर २०२१ अखेर १४ वर्ष कंत्राटी सेवा झालेली असून, नोव्हेंबर २०२१ पासून ०१ वर्ष ०९ महिने कायमची सेवा झालेली आहे. दि.०३/०६/२०११ चे शासन निर्णयानुसार विनंतीवरुन / संवर्गबाह्य बदली करावयाची झाल्यास संबंधीत कर्मचाऱ्याची किमान ५ सेवा झालेली असावी व त्यामध्ये अपवादात्मक परिस्थिती त्यामध्ये २ वर्ष इतका कालावधी शिथिल करता येईल म्हणजेच किमान ३ वर्ष सेवा पुर्ण झाली असल्यास अपवादात्मक परिस्थितीत विनंती विचारात घेता येईल अशी तरतुद आहे. डॉ.छाया हंकारे यांची सन २००७ पासूनची १४ वर्षाची सेवा कंत्राटी असून, त्यांच्या सेवेचे कायमपणे समायोजन महापालिकेत सन २०२१ मध्ये झालेले असलेने, महापालिकेमध्ये त्यांची एकूण सेवा सुमारे १५ वर्ष झालेली आहे. या बाबीचा विचार करता तसेच, आयुक्त पुणे महापालिका यांचे दि.२१/०७/२०२३ चे पत्राने कळविलेनुसार अन्य संसंवर्गीय महापालिकेतील एखाद्या कर्मचाऱ्याने बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास किंवा पुणे महापालिकेतील एखाद्या कर्मचाऱ्यांने अन्य संसंवर्गीय महापालिकेतील पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास दोन्ही महापालिकेच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या संमत्तीने शासन मान्यतेने बदलीचा निर्णय घेता येईल असे कळविलेले आहे. त्यानुसार डॉ.छाया रामचंद्र हंकारे आर्युवेदीक वैद्यकीय अधिकारी वर्ग २ या पदाबर पुणे महापालिकेत एकतर्फी बदली करणेस पुढील निर्णयास्तव मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रशासन अधिकारी (आस्था)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २७ **दिनांक** :- २१/११/२०२३

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२०/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, सन २०२३-२४ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील खालील तीन कामांचा र.रु.३,२३,९५,४७९/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरी साठी पाठविणेस तसेच, सदर प्रस्ताव र.रु.३,२३,९५,४७९/- मात्रपैकी ५०% र.रु.१,६१,९७,७३९/- मात्र जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेमधून प्रस्तावित असून, उर्वरित ५०% र.रु.१,६१,९७,७३९/- मात्रची तरतुद महानगरपालिका निधीतून करणेस मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रुपये
१.	पुणे- मिरज रेल्वे दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत रेल्वे किमी २६९/९६९ मधील रेल्वे पुनर्बांधणी करणे अंतर्गत वाहतुकीच्या सोईसाठी उड्डाण पुलाच्या उत्तरेकडील बाजूस ६ मी. X ६ मी. मापाचे भुमिगत मार्ग (Subway) करणे.	२,१६,२७,७९८/-
२.	सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत येथील हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	५०,९४,१०२/-
३.	सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील भारत सुत गिरणी ते जकात नाका कुपवाड या पु.+प. रस्त्याच्या उत्तर बाजूस महावितरण कंपनीच्या मालकीची असलेली उच्च व लघुदाब वाहिनी शिफ्ट करणे.	५६,७३,५७९/-
	एकूण र.रु.	**३,२३,९५,४७९/-**

उक्त विषयाच्या अनुषंगाने सभेत झाले चर्चेनुसार मा.श्री.धनंजय उर्फ सुधीर हरी गाडगीळ, सांगली विधान सभा मतदार संघ यांनी सांगली कलानगर येथील नागरीकांच्या मागणीनुसार व भविष्यात कलानगर परिसराचा होणारा विकास व भविष्यात या परिसरामध्ये वाढणाऱ्या वाहतुकीचा विचार करता, कलानगर येथे रेल्वे अंडरपास करणे आवश्यक असलेने त्यासाठी मा.शासनाकडून निधी मंजुर करणेत येईल असे कळविले असून, त्यानुसार उड्डाण पुलाच्या दक्षिणेकडील बाजूस ६ मी. X ६ मी. मापाचे भुमिगत मार्ग करणेस र.रु. २,१६,२७,७९८/- मात्रचे खर्चास व सदरचा निधी मा.शासन निधी / जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना / मनपा निधीतून उपलब्ध करुन रेल्वे प्रशासनाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका